Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(A)| January - 2026

Original Article

# मराठ्यांची गनिमी कावा युद्धनीती स्वरूप, तत्वे आणि परिणाम

**प्रा.डॉ. आर. सी. फाटक**
श्री शिवाजीराव पंडित कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गढी. ता. गेवराई,जि. बीड
**Email:** drramhariphatak@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180116
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 1(A)
Pp. 81-83
January - 2026

**Submitted:** 16 Dec. 2025
**Revised:** 26 Dec. 2025
**Accepted:** 11 Jan. 2026
**Published:** 31 Jan. 2026

**सारांश**

*' गनिमी कावा ' ही मराठ्यांनी विकसित केलेली युद्धनीती केवळ रणांगणातील कौशल्य नसून ती जनाधारित भौगोलिक रणनीतीची विचारसरणी होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी विशाल साम्राज्याच्या विरोधात अल्पसाधने आणि अल्प मनुष्य बळ यांच्या आधाराने तयार केलेल्या भारतीय रणनीतीचे हे देशी मॉडेल आहे.या संशोधनात गनिमी काव्याची उत्पत्ती , त्याचे तात्विक संघटनात्मक स्वरूप , सामाजिक आणि राजकीय परिणाम तसेच आधुनिक गुरूल्ला युद्धावर त्याचा प्रभाव या सर्व बाबींचा विचार केला आहे.या संशोधन पेपरचा अभ्यास ऐतिहासिक - विश्लेषणात्मक पद्धतीने केला असून प्राथमिक व द्वितीय स्तोत्रांचा तुलनात्मक वापर केला आहे.या संशोधनातून स्पष्ट होते की , 'गनिमी कावा ' हे केवळ रणतंत्र नव्हे , तर मराठी स्वाभिमान , लोकसहभाग आणि स्वतंत्रतेच्या आकांक्षेचे जीवंत प्रतीक आहे.*

## प्रस्तावना

भारताच्या लष्करी इतिहासात मराठ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.इ.स.नाच्या १७ व्या शतकामध्ये मोगल साम्राज्य भारतीय भूमीवर आपल्या . सैन्यशक्तीचे वर्चस्व गाजवत होते. त्या काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी या गनिमी कावा नितीद्वारे युद्धास बुद्धीचे व लोकाभिमुख असे स्वरूप दिले.गनिमी कावा या शब्दाचा अर्थ शत्रूला चकवून विजय मिळवणे असा आहे.ही नीती भूगोल ,वेग , गुप्तता आणि मानसिक संतुलन यावर आधारलेली होती.शिवाजी महाराजांच्या म्हणण्यानुसार लढाई जिंकण्यासाठी बल , बुद्धी , व समय यांची गरज असते. ( सभासद बखर ,पृ. ८७ ) हीच विचारधारा शिवाजी महाराज व त्यानंतर शिवकाळातील मराठा सरदारांच्या लष्करी मोहिमांमध्ये दिसते.मराठ्यांनी समोरासमोरच्या परंपरागत युद्धापेक्षा छापामार पद्धतीने शत्रूवर प्रचंड आघात केले. या युद्धनीतीने मराठ्यांना केवळ विजयच दिला नाही , तर राज्यसंस्थेचे स्वातंत्र्य जपण्याचे सामर्थ्यही दिले.

## उद्देश

1. गनिमी काव्याच्या उत्पत्तीचा ऐतिहासिक मागवा घेणे.
2. मराठ्यांच्या लष्करी संघटनेत गनिमी नीतीचे स्थान स्पष्ट करणे.
3. या युद्धनीतीचे भौगोलिक , सामाजिक आणि राजकीय संदर्भ तपासणे.
4. शिवकाळ ते पेशवाई या काळातील युद्धनीतीतील बदलांचा अभ्यास करणे.

## ग्रहीतक

गनिमी कावा ही मराठ्यांच्या लष्करी बुद्धिमत्तेचे जनसहभागाचे आणि स्वराज्य - संकल्पाचे मूर्त स्वरूप होते. ही युद्ध पद्धती युद्धापेक्षा अधिक सांस्कृतिक व रणनीतीप्रधान विचारप्रणाली होती.

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.18617258

OPEN ACCESS

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा.डॉ. आर. सी. फाटक, श्री शिवाजीराव पंडित कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गढी. ता. गेवराई,जि. बीड*

**How to cite this article:**
*आर. सी. फाटक. (2026). मराठ्यांची गनिमी कावा युद्धनीती स्वरूप, तत्वे आणि परिणाम. Journal of Research & Development, 18(1(A)), 81–83.* https://doi.org/10.5281/zenodo.18617258

**संशोधन पद्धती**

या संशोधनात ऐतिहासिक - विश्लेषणात्मक ( Historical Analytical ) पद्धत वापरण्यात आली आहे.

1. प्राथमिक स्तोत्र.
2. द्वतीय स्तोत्र

**विश्लेषण**

**अ ) गनिमी काव्याची संकल्पना व स्वरूप -**

मराठ्यांची गनिमी नीती पारंपारिक भारतीय युद्धशास्त्रापासून वेगळी होती. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात कूटयुद्ध व तुष्णी युद्ध यांचा उल्लेख आढळतो - ज्यात शत्रूला गुप्ततेने हानी पोहोचवण्याचे तत्व आहे. शिवाजी महाराजांनी हाच विचार गनिमी कावा या रूपात प्रगत केला. ( सतीश चाकेकर , शिवाजीआणि गनिमी युद्धनीती , पृ. ८2 )

मराठ्यांच्या युद्धनीतीमध्ये खालील तत्वे महत्त्वाची होती-

1. शत्रूवर अनपेक्षित हल्ला करणे.
2. शत्रूच्या रसद मार्गावर आघात करणे.
3. वेगवान अश्वदल वापरून अचानक हल्ला करणे.
4. किल्ले आणि भूगोलाचा लाभ घेणे.
5. शत्रूला चकवून त्याचा आत्मविश्वास खच्ची करणे.

शिवाजी महाराजांच्या गनिमी दलातील योद्धे अतिशय वेगवान आणि चिपळाईने हालचाली करून शत्रू सैन्यावर अनपेक्षित हल्ले करून त्यांना दिवसा अंधार दाखवत. (राजवाडे , मराठी रियासत , खंड- ४ , पृ. १२६ )

**ब ) भौगोलिक व सामाजिक पार्श्वभूमी -**

सह्याद्री पर्वताच्या डोंगरदऱ्या , किल्ले , घाट , जंगल , नद्या हेच गनिमी युद्धाचे रणांगण होते. या भूगोलामुळे मराठ्यांना संरक्षण व गुप्त हालचारासाठी अनुकूल वातावरण मिळाले. स्थानिक जनता व शेतकरी यांचा सहभाग या नीतीचा आत्मा होता. शत्रूला अन्न रसद न देता स्थानिक भूगोलाचा कुशलतेने उपयोग करणे हे मुख्यतत्त्व होते.' गनिमी युद्ध म्हणजे जनता व भूगोल यांच्या मैत्रिने लढलेले युद्ध. ' (A.R. kulkarni , Maratha warfare and Administration ,P. 54 )

**क ) रणनीती आणि संघटन -**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या गनिमी दलामध्ये सैनिकांपेक्षा ' स्वयंस्फूर्त योद्धे ' अधिक होते. मराठ्यांनी सतत छावण्यांचे ठिकाण बदलत राहायचे , दूत , संदेशवाहक , व्यापारी आणि स्त्रिया सुद्धा माहिती पोहोचवण्यात सहभागी होत. राज्याच्या प्रशासनाशी लष्करी गुप्तता जुळलेली होती.

शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानावर केलेला हल्ला ( इ.स. १९६३ ) हा गनिमी नीतीचा सर्वोत्तम नमुना मानला जातो. फक्त 300 मावळयांनी औरंगजेबाच्या सेनानायकावर पुण्यात हल्ला करून त्याला पराभूत केले - हे जगातील सर्वात उत्कृष्ट छापामार ऑपरेशन मानले जाते.( Jadunath Sarkar , shivaji and His Times , p . 203 )

**ड ) मोगल व इतर शक्तीवर परिणाम -**

मोगल साम्राज्य हे भारतातील सर्वात विशाल साम्राज्य असले तरी ते गतिशील युद्धासाठी सक्षम नव्हते. मराठ्यांच्या चपळ हल्ल्याने त्यांचे पुरवठा मार्ग तोडले , छावण्या लुटल्या , मोगल सैन्याची सतत लांडगे तोड केली. औरंगजेब स्वतः 27 वर्ष दक्षिणेत अडकला पण निर्णायक विजय मिळवू शकला नाही.

( Govind sardesai , New History of the Marathas , vol. II , P. 87 ).

मराठ्यांच्या या युद्धनीतीमुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे 'क्षेत्रीय राज्य ' 'साम्राज्य ' बनले. गनिमी काव्यामुळेच मराठा राज्याचा प्रभाव उत्तर भारतात सर्वदूर पसरला.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(A)| January - 2026

**ई )मानसिक युद्ध आणि जनसहभाग -**

गनिमी कावा युद्धनीतीचे एक विशेष अंग म्हणजे 'मानसिक दबाव ' ( Psychological pressure ) शत्रूला कायम भीतीत ठेवणे , वेळोवेळी आघात करणे , आणि पूर्ण आघाडीवर कधीही न भिडणे ही पद्धत मौगलांना त्रस्त करीत असे. मराठ्यांच्या या लढ्याला ' ' 'जनतेचा लढा ' म्हणता येईल. मावळा हा फक्त सैनिक नव्हता , तो स्वराज्याचा रक्षक होता.
(न.स. टाकसाळे , मराठ्यांची युधुसंस्था , पृ. ९६ )

**फ ) आधुनिक युद्धावरील प्रभाव -**

1857 च्या उठावात तात्या टोपे , राणी लक्ष्मीबाई यांनी गनिमी नितिचा अवलंब केला. 1947 नंतर भारतीय सैन्यातील काउंटर इन्सर्जन्सी डॉक्ट्रिन मध्ये ' Hit and Run 'तत्वांचा उल्लेख आढळतो. त्याचप्रमाणे व्हिएतनाम , अफगाणिस्तान , क्युबा , यासारख्या युद्धामध्ये मराठा गनिमी काव्यासारखी नीती वापरण्यात आली.
( Balkrishna H.S. Maratha military system, p .178 )

**समारोप**

'गनिमी कावा ' ही मराठ्यांची केवळ रणनीती नव्हती , तर ती स्वराज्य संकल्पाचे तत्वज्ञान होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या या नीतीने भारतीयांना स्वातंत्र्य लढ्याचे मार्गदर्शन केले. गनिमी कावा हे तत्व आजही गुप्तता , वेग आणि भूगोलाचा योग्य वापर या तीन स्तंभावर उभे आहे. मराठ्यांनी युद्धात बुद्धी , लोकसहभाग आणि राष्ट्रभावना एकत्र आणली हीच त्यांची खरी शक्ती होती. आजही भारतीय लष्कराचे ( Mountain warfare ) तंत्र गनिमी काव्याच्या मूळ विचारांची सुसंगत आहे.

**संदर्भ ग्रंथ**

1. चिटणीस, कृष्णाजी अनंत, शिवछत्रपतींची बखर, पुणे, भारत इतिहास संशोधन मंडळ.
2. सभासद बखर, संपादक - बाबासाहेब पुरंदरे, पुणे.
3. राजवाडे वि. का. मराठी रियासत , खंड - 3 -८ .
4. सर देसाई गो. स.मराठ्यांचा इतिहास , पुणे.
5. न.स.टाकसाळे, मराठ्यांची युद्धसंस्था,
6. सतीश चाफेकर, शिवाजी आणि गनिमी युद्धनीती.
7. Govind Sakaram Sardesai, The New History of the Marathas, Oxford University press.
8. Jadunath sarkar,Shivaji and his times.
9. A.R. Kulkarni, Maratha warfare and Administration.
10. BalKrishna H.S Maratha military system.